# दारुविषयी आधुनिक पाश्चात्य

डॉ. अभय बंग

मुक्त दारु की दारुमुक्ती ? भारतीय समाज दोलायमान मनस्थितीत आहे. आंध्र, ओरिसा, तामिळनाडू, अरुणाचल प्रदेश, मणिपूर या राज्यांनी खुल्या दारुच्या अनुभवानंतर संपूर्ण किंवा आंशिक दारुबंदीचा पुन्हा स्वीकार केला आहे, तर स्वातंत्र्यापासून सतत दारुबंदी असलेल्या गुजराथची दारुबंदी बदनाम आहे. महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी लागू केली. १९९४ मधे पूर्ण महाराष्ट्रात ग्रामसभा किंवा स्त्रिया मागणी करतील त्या गावातील दारु दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला. पण शहरांमध्ये दारुवर नियंत्रण नाही. उलट, प्रमुख वर्तमानपत्रे व फॅशनेबर नियतकलिकांत, तसेच दूरदर्शनवर ऑरिस्ट्रोक्रॅट, मॅकडॉवेल, बॅगपाइपर वगैरे दारुंच्या मोहक जाहिरातींमध्ये अचानक वाढ झाली आहे. दारुनीतीसंबंधात आपण अजून उत्तर शोधत आहोत.

जगात इतरत्रही या प्रश्नाचे उत्तर शोधणे सुरु आहे. पाच वर्षांपूर्वी तीन महिन्यांच्या एका संशोधन फेलोशिपवर अमेरिकेला जाण्यापूर्वी आमच्या गडचिरोली जिल्ह्यातील ३०-४० गावांच्या सरपंचांची एक बैठक बोलवून त्यांना मी व माझ्या पत्नीने सल्ला विचारला की अमेरिकेत कोणत्या प्रश्नांवर आम्ही अध्ययन-संशोधन करावे ? त्यांनी जे प्रश्न सुचवले त्यातला एक होता, 'आम्ही पुरुष दारु कां पितो ? आम्हाला दारु पिणे कसे सोडता येईल ?' हे सोपे प्रश्न जेव्हा मी जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटीच्या व्यसनतज्ज्ञ प्रो. जेम्स अँथनींना विचारले तेव्हा गंभीर चेहऱ्याने त्यांनी मला उत्तर दिले, "डॉ. बंग, तुमच्या सरपंचांना सांगा की या साध्या प्रश्नाचं उत्तर जेव्हा मला सापडेल तेव्हा मला नोबल पारितोषिक मिळेल!" दारुच्या प्रश्नावर हमखास उपाय माणूस अजून शोधतोच आहे.

वॉशिंग्टनहून जागतिक बँकेने नुकताच प्रकाशित केलेला एक तांत्रिक अहवाल, इंग्लंडच्या रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्स या वैद्यकीय संघटनेने ब्रिटिश राष्ट्राला उद्देशून प्रकाशित केलेला एक रिपोर्ट व ब्रिटिश मेडिकल असोसिएशनने प्रकाशित आधुनिक चिंतन प्रकट झालेले आहे. या अहवालांमुळे दारुविषयक चर्चा ही निव्वळ आपापली वैयक्तिक आवड व मत या पातळीची न राहता तिला वैद्यकशास्त्र व अर्थशास्त्राचा आधार मिळाला आहे. भारतातील 'मुक्त दारु की दारुमुक्ती' या प्रश्नाच्या संदर्भात आपण वरील पाश्चात्य विचार समजून घेऊ.

## वैद्यक शास्त्राचे मत

शरीरातील प्रत्येक अवयवाला दारु मुळे इजा पोहचू शकते. विशेषतः मेंदू, मज्जातंतू, रक्त, रोगप्रतिकारक शक्ती, हृदय व रक्तवाहिन्या, यकृत, जठर, पॅन्क्रीआज्, एंडोक्राइन ग्रंथी, लैंगिक अवयव, प्रजनन शक्ती या सर्वांना प्रथम तात्पुरती व पुढे कायमची इजा पोहचून ते अवयव निकामी होतात, पोटाचे कॅन्सर दहा पटीने वाढतात व जास्त प्रमाणात दारु पिणाऱ्याचा सरासरी १५ ते २० वर्षे अगोदर अकाली मृत्यू होतो. दारुमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या रोगांची रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्सने दिलेली यादी दीड पान लांबीची आहे. त्यामुळे ती इथे उध्दृत करणे शक्य नाही.

गेल्या दशकात स्वीडनमध्ये माल्मो येथे दहा हजार पुरुषांच्या दारुच्या संवयी व त्याचे आयुष्यमानावर परिणाम यावर दीर्घकाळाचे अध्ययन झाले. त्यात असे आढळले की पुरुषांमधील १/३ मृत्यूंसाठी दारु जबाबदार असून मध्यमवयीन पुरुषांच्या मृत्यूचे सर्वात महत्वाचे मूलभूत कारण दारु होती. जागतिक आरोग्य संघटनेने काढलेल्या आकडेवारीनुसार जगात अल्कोहोलमुळे एकूण २१ लक्ष मृत्यू दरवर्षी होतात. ब्रिटिश मेडिकल असोसिएशनने प्रकाशित केलेल्या माहितीनुसार रुग्णालयांतील २० ते ३३ टक्के रुग्णभरती दारुनिर्मित असते. इंग्लंडच्या ऑफिस ऑफ हेल्थ अइॉनॉमिक्स ने काढलेल्या आकडेवारीनुसार दारु न पिणारे किंवा थेडी पिणारे वर्षातून सरासरी १२ दिवस कामावरुन गैरहजर असतात, तर भरपूर पिणारे ६० दिवस. या सव्र परिणामांची चर्चा करुन रॉयल कॉलेजचा अहवाल ब्रिटिश राष्ट्राला आवाहन करतो की पुढील १० वर्षांत ब्रिटनमधील दारुचा उपयोग किमान १/३ ने कमी करावा.

अर्थशास्त्रीय मत

पण निव्वळ वैद्यकीय मतानुसार दारुसंबंधी निर्णय लागणार असता तर तो केव्हा लागून चुकला असता! दारुचे काही फायदे लोकांना दिसतात म्हणूनच तर ती प्रचलित आहे. पिणाऱ्याला त्यापासून मिळणारे सुख व समाधान, माफक प्रमाणात पिण्यामुळे हृदयरोग कमी होतात असा काही अभ्यासमांचा विश्वास व या दोन्हींचा वापर करुन 'प्या, जरुर प्या, पण समजूतदारपणू प्या' (Sensible drinking) अशी फॅशन निर्माण करण्याचा प्रयत्न करणारी दारु उत्पादकांची जागतिक लॉबी, दारुचे उत्पादन व विक्री यामध्ये गुंतलेले प्रचंड आर्थिक व व्यावसायिक हित आणि सरकारांना त्यापासून मिळणार कर, या सर्व बाबींचा सारासार विचार निव्वळ वैद्यकीय आधारावर होऊ शकत नाही, तर हा एक अर्थशास्त्रीय प्रश्न आहे असे अनेक लोक मानतात. आणि सध्या तर जगावर अर्थशास्त्राचे वर्चस्व आहे. यासाठी आपण जागतिक बँकेचा निबंध बघू.

जागतिक बँकेने नुकताच प्रकाशित केलेला तांत्रिक अहवाल अनपेक्षित आहे. भांडवलशाहीचे हितरक्षण करण्याची जिच्याकडून अपेक्षा, त्या बँकेने दारुविषयक एक नवीन अर्थशास्त्रीय भूमिका मांडली आहे. ती थोडक्यात अशी - अविकसित देशांत मुक्त अर्थव्यवस्थेमुळे जसजसे जीवनमान उंचावत जाते तसतसा हातात खेळणारा पैसा वाढून दारुचा वापर वाढतो. त्यामुळे अकाली मृत्यूव्यतिरिक्त अनेक व्यापक प्रश्न निर्माण होतात. मुख्य म्हणजे माणसांचा विकास व कार्यक्षमता कमी होते. दारुमुळे समाजाला पडणारा आर्थिक व सामाजिक समस्यांचा भुर्दंड फार मोठा आहे. अविकसित देशांचे मुख्य भांडवल हे मानवीय भांडवल असल्याने अनियंत्रित दारु ही अविकसित देशांच्या विकासाला बाधक ठरेल. म्हणून अविकसित देशांच्या शासनांनी दारु-नियंत्रणाचा प्रयत्न करणे व आरोग्य, शिक्षण याचप्रमाणे दारु-नियंत्रणावर गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

मानव समाज किती दारु पितां ? अविकसित देशांत मोठ्या प्रमाणात हातभट्टी किंवा इतर प्रकारची बेकायदेशीर दारु वापरली जाते. तिचा काहीच हिशेब नसल्याने केवळ शासकीय आकडेवारीवरुन दारुच्या वापराचा एकूण अंदाज लागणे कठीण. पण श्रीलंकेत केलेल्या एका अध्ययनानुसार शासनालास कराच्या रुपात मिळणाऱ्या प्रत्येक रुपयामागे कायदेशीर व बेकायदेशीर मिळून पाच रुपयांची दारु खपते. गडचिरोली जिल्ह्यातील दारुचे व्यापारी व जाणकार मंडळींनीही नेमका हाच अंदाज स्वतंत्रपणे सांगितला. या हिशेबानुसार महाराष्ट्रात पाच हजार कोटी रुपये व भारतात पन्नास हजार कोटी रुपये दरवर्षी दारुवर खर्च होतात. महाराष्ट्राचा नियोजन मंडळाने मंजूर केलेला विकासाचा आराखडा २४०० कोटी रुपयांचा होता व दारुवरचा

खर्च त्याच्या जवळपास दुप्पट होता. इंग्लंडच्या अधिकृत आकडेवारीनुसार १९८१ साली तेथील जनतेने ५५ हजार कोटी रुपये, अर्थात एकूण उत्पन्नाच्या सात टक्के भाग दारुवर खर्च केला. मोटारी, दवाखाने, कपडे, शाळा-कॉलेजे, पुस्तके अशा कोणत्याही प्रकारच्या खर्चापेक्षा रारुवरील खर्च जास्त होता.

पण लोक काय मूर्ख आहेत ? खर्चापेक्षा जास्त सुख त्यांना दारुमधून मिळते म्हणून त्यांनी दारुवर केलेला खर्च हा ग्राहकाची मुक्त निवड आहे, त्यांचा तो अधिकार आहे, असा तर्क काही अर्थशास्त्रज्ञ देतात. यावर बँकेने दिलेले उत्तर असे - दारु पिणाऱ्याचे स्वतःवर नियंत्रण नसते, तो मुक्त निवड करतच नसतो. उलट तो सवय किंवा व्यसनाने दारु पिण्याला बांधलेला असतो. म्हणून दारुचा व्यापार हा मुक्त बाजारपेठेच्या तत्वाच्या विरोधी आहे. शिवाय दारुच्या व्यापाराचे निव्वळ ग्राहक व विक्रेता यामध्ये होणाऱ्या देवाण-घेवणीपलीकडे असलेले व्यापक परिणाम, या परिणामाविषयी अज्ञ असलेला ग्राहक आणि या परिणामांमुळे समाजाला मोजावी लागणारी किंमत, या कारणांमुळे दारुच्या धंद्यात मुक्त बाजारपेठ निकामी होते.

समाजाला पडणारी दारुची किंमत

ग्राहकाने दारुवर केलेल्या वरील खर्चाव्यतिरिक्त समाजाला मोजावी लागणारी किंमत कोणती व किती ? ही किंमत जागतिक बँकेचा अहवाल खालील प्रकारे मोजतो.

- दारुमुळे होणाऱ्या अकाली मृत्यूंचा समाजाला भुर्दंड.
- दारुमुळे कामावरुन गैरहजेरीमुळे कमी होणारी उत्पादक शक्ती.
- दारुमुळे निर्माण होणाऱ्या रोगांमुळे होणारा वैद्यकीय उपचारांचा खर्च.
- वाहनांचे अपघात, आग.
- गुन्हे व त्यामुळे निर्माण होणारा पोलीस, न्यायालय व तुरुंगांचा खर्च,
- दारुमुळे लहान मुलांवर होणाऱ्या दुष्परिणामांचा खर्च
- दारुड्यांच्या पुनर्वसनासाठी होणारा समाज-कल्याण खर्च.

भारतीय समाजासाठी अशी आकडेवारी उपलब्धच नाही. म्हणजे अशा प्रकारची किंमत आपण चुकवतो आहोत, पण समाजाला त्याचा पत्ता नाही किंवा मोजदाद नाही. म्हणून आपण परदेशी आकडेवारी बघू. अमेरिकेला अशा प्रकारे होणारे नुकसान किती ?  शिफ्रिन या शास्त्र्ज्ञाने १९७९ साली काढलेली व व्यापकरीत्या मान्य झालेली किंमत होती वार्षिक ११३ अब्ज डॉलर्स म्हणजे ३४,००० कोटी रुपये! वेगळ्या तऱ्हेने मांडल्यास अमेरिकेत ही किंमत प्रति माणशी साडेतेरा हजार रुपये पडते. समाजाला मोजावी लागलेली ही किंमत दारुपासून मिळणाऱ्या कराच्या २५ ते ४० पट अधिक होती. म्हणजे दारुच्या दुष्परिणामांच्या खर्चाचा बोजा समाजावर ढकलून हा प्रचंड आतबट्टयाचा आर्थक व्यवहार सुरु आहे. म्हणून जागतिक ब□क दारुच्या बाजाराला अर्थशास्त्रीयदृष्ट्या घातक म्हणते.

लेडरमन या विद्वानाने मांडलेल्या प्रमेयानुसार समाजातील दारुचा वापर क्ष प्रमाणात वाढला की त्याचे विविध दुष्परिणाम क्ष पटीने न वाढता क्ष$^{२}$ (क्ष गुणिले क्ष) पटींनी वाढतात. १९४० च्या दरम्यान चक्रवर्ती राजगोपालाचारींनी काढलेल्या आकडेवारीनुसार भारतात दारुपासून मिळणारा एकूण कर २५ कोटी रुपये होता. आज तो १०००० कोटी रुपये आहे. यावरुन दुष्परिणामांची वाढ कोणी मोजून बघावी.

जागतिक बँक अहवालाने सादर केलेली दुसरी आकडेवारी अशी : दररोज ३ ते १० ग्लास पिणाऱ्यांचे १८ वर्षावरील लोकसंख्येतील प्रमाण अमेरिकेत ९%, कोस्आरिकात १०% व मेक्सिकोत ७% आहे. या सात टक्क्यांची पुढची फोड अशी – मेक्सिकोतील अर्धा टक्का बाया व १४ टक्के पुरुष दररोज सज्जड पितात. दारुच्या दुष्परिणामांचा मुख्य भार हेच वहन करतात. भारतासंबंधात अशी आकडेवारी उपलब्ध नसली तरी मेक्सिकोपेक्षा कमी, १८ वर्षांवरील वयाची जवळपास ५% लोकसंख्या सज्जड पिते, असे मानल्यास भारतातील अशांची संख्या जवळपास तीन कोटी निघते. हे बहुतेक पुरुष असल्याने यांची तीन कोटी कुटुंबे किंवा एकूण १५ कोटी कुटुंबीय दारुने पीडित आहेत.

जागतिक बँकेचा अहवाल शेवटी या निष्कर्षाशी येतो –

“बहुतेक देश शिक्षण आणि आरोग्यावर भर देऊन विकास साधण्याच्या प्रयत्नात असतानाच एकीकडे दारुमुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे आणि जिथे जिथे दारु उत्पादन आणि दारुच्या समस्यांवर सरकारे नियंत्रण ठेवू शकलेली नाहीत, त्याविरुध्द प्रभावी उपाययोजना करु शकलेली नाहीत, तिथे तिथे दारुमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाणही वाढले आहे. माणसाचे वाढते उत्पन्न आणि दारुचे वाढते उत्पादन अंतिमतः राष्ट्राच्या प्रगतीलाच बाधा आणणारे ठरते.”

“कुटुंब-कल्याणविषयक धोरणे आखण्याची वाढती गरज हेच दर्शवते की अकाली मृत्यू, रोगराई तसेच छोटेमोठे दुष्परिणाम यांचा प्रभाव वाढलेला आहे. दारुच्या दुष्परिणामांना १५ ते २४ या वयोगटातील तरुण, तसेच अल्प उत्पन्न गटातील माणसे सर्वाधिक बळी पडतात. याचे कारण असेक की या माणसांना दारुपासून होणाऱ्या अपायांची कल्पनाच नसते. दारु समाजाकडून जबर किंमत वसूल करते.”

## जीवनशैली बदला!

देवी, मलेरिया, कॉलरा अशा संक्रामक रोगांनी पूर्वी मोठ्या प्रमाणात माणसे मरायची. अशा रोगांचे नियंत्रण करण्यात यश मिळाल्याने माणसाची आयुर्मर्यादा वाढत चालली आहे. भारतातील सरासरी आयुर्मान १९४७ साली ३२ वर्षे होते, ते आता ५८ वर्षे आहे. सुधारित राहणीमान व वाढते वय याबरोबर हृदयरोग, ब्लड प्रेशर, कॅन्सर व लठ्ठपणा या समृध्दीच्या रोगांचा सामना पाश्चिमात्य देशांना करावा लागला. तेथे मृत्यूची प्रमुख कारणे आता वरील रोग आहेत. या रोगांवर वैद्यकशास्त्राकडे हुकमी औषध किंवा लस नाही. त्यामुळे गेल्या २०-२५ वर्षात आधुनिक वैद्यकशास्त्रामध्ये ‘जीवनशैलीत बदल’ यावर वाढता भर आहे. आहार नियंत्रित करा, तेल-तूप कमी करा, व्यायाम व जॉगिंग करा, यासोबत कॅन्सर टाळण्यासाठी धूम्रपान सोडा, एड्सपासून बचावासाठी लैंगिक वर्तन बदला, हे मुख्य उपाय पुढे आले आहेत. स्वतःच्या आचरणावर नियंत्रण हे प्रमुख शस्त्र बनले आहे.

आयुर्मानाच्या प्रत्येक वाढीव वर्षासाठी पाश्चिमात्य समाजाला कोणत्या तरी घातक संवयीचा त्याग करावा लागला, धूम्रपान, लठ्ठपणा, कोलेस्टेरॉल, एड्स-नियंत्रणासोबत युध्दाची पुढची आघाडी मद्यपान-नियंत्रण होणार हे हळूहळू स्पष्ट होते आहे. याचा पुरावा ? दारु पिण्यासाठी जगप्रसिध्द असलेल्या फ्रेंच राष्ट्राने दारु पिण्याचे प्रमाण कमी करायला सरुवात केली आहे.

दारुचे दुष्परिणाम टाळण्यासाठी व्यक्तीने स्वतःच्या आचरणावर नियंत्रण ठेवून दारु कमी किंवा बंद करणे, तसेच जीवनशैलीत बदल घडवून जीवनातील इतर सकारात्मक गोष्टींत आनंद

घेणे शिकले पाहिजे. त्यामुळे तात्कालिक आनंदासाठी व ताण घालवण्यासाठी माणसाला दारुचा आश्रय घेण्याची गरज भासू नये. या दिशेने गेल्यास माणूस परनियंत्रित होण्याऐवजी आत्मनियंत्रित, स्वावलंबी व शक्तिमान होईल. विकासाची ही दिशा स्वागतार्ह आहे.

सामाजिक नियंत्रणाचे मार्ग

दारु प्यावी की पिऊ नये हा निर्णय शेवटी व्यक्तीवर सोडावा, त्यासाठी लोकशिक्षण करावे, पण दारुवर सामाजिक नियंत्रण नको, असा एक तर्क देण्यात येतो. ब्रिटिश मेडिकल असोसिएशनने प्रकाशित केलेल्या 'ए-बी-सी ऑफ अल्कोहोल' या पुस्तकात या तर्काची चर्चा केली आहे. एकतर दारु पिणारा बऱ्याच वेळा आपले हित कळण्याच्या स्थितीत नसतो. दुसरे, दारुमुळे समाजाचे होणारे नुकसान फार व्यापक असल्याने समाज व शासन याबाबतीत निष्क्रिय भूमिका घेऊ शकत नाही. तिसरे, निव्वळ लोकशिक्षणाने दारु पिणे नियंत्रित होईल हा भ्रमाचा भोपळा अनुभवांती फुटला आहे. चौथे, राजकीय निर्णय व धोरण यामुळे दारुचा एकूण खपक मी करता येतो हे लक्षात आले आहे. म्हणून दारुसंबंधात शासकीय धोरण आवश्यक आहे. यासाठी पाश्चिमात्य समाजाने वापरलेल्या विविध उपायांपासून आपण शिकू शकतो.

पाश्चिमात्य संस्कृतीत दारु पिणे सर्वमान्य रीतिरिवाज असल्याने कायेदशीर दारुबंदी यशस्वी ठरत नाही, असा तिकडील अनुभव आहे. समाजातील दारुचा एकूण वापर कमी करण्यासाठी व्यापक व विविध प्रकारच्या उपायांवर लक्ष देण्यात येत आहे. दारुवर कर लादून दारुच्या किंमती वाढवणे, दारु पिण्याची वयोमर्यादा वाढविणे, दारु दुकाने उघडी ठेवण्याचे तास कमी करणे, जाहिराती व खेळांच्या स्पॉन्सरशिपमार्फत दारुच्या प्रचारावर बंदी, ड्रायव्हिंगविषयी कायदे अधिक कडक करणे, यापासून ते दारुच्या दुष्परिणामांची व्यापक माहिती लोकांना देणे, दारु पिणे कसे टाळावे किंवा नियंत्रित करावे याबाबत व्यक्तींना शिक्षण देणे, व्यसनींना मानसोपचार देणे, त्यासाठी आवश्यक ती व्यसनमुक्ती सेवा निर्माण करणे, असे विविध उपाय यात मोडतात.

हे सर्व उपाय किंवा दारुबंदी करुनही जगातील कोणताच समाज पूर्णपणे दारुमुक्त नाही. तसाच तो कॅन्सर, हृदयरोग, एड्स किंवा चोरी, अपघात-मुक्तही नाही म्हणून हतबल होऊन याविरुध्द लढाई करणे मानव सोडत नसतो. ते आत्मघातकी ठरेल. शंभर टक्के विजय नाही तरी त्या दिशेने इंच इंच तो सरकत असतो. दारु-नियंत्रणाची लढाईदेखील अशीच लांब पल्ल्याची असणार आहे. शिवाय भारतीय संस्कृतीत दारु ही रीतिरिवाज म्हणून रुढ नसल्याने दारुबंदीचे शस्त्रही भारतात उपलब्ध आहे. दारुचे नियंत्रण करण्यासाठी आंशिक किंवा पूर्ण दारुबंदी ही आवश्यक पूर्वअट आहे. पण निव्वळ दारुबंदी किंवा कायदा पुरेसा नाही. त्याला वरील उपायांची जोड देणे आवश्यक आहे.

निवडक दारुबंदी ?

समाजात बहुतेक जण काही नुकसान न होता दारुचा आस्वाद घेऊ शकतात, फक्त काहीजणच दारुला बळी पडतात, म्हणून एकूणच दारु पिण्याविरुध्द आरडाओरड करण्याऐवजी फक्त व्यसनींना ओळखून उपचार करावा, असे मानणारे आहेत. पण रॉयल कॉलेजने मांडलेला शास्त्रीय विचार असा -

कोणत्याही लोकसंख्येत दारु पिण्याच्या बाबतीत, कधीही न पिणारे, क्वचित् पिणारे, नियमित पण संयमित पिणारे, भरमसाट पिणारे, समस्याग्रस्त पिणारे, पूर्णपणे दारुवर अवलंबित व्यसनी अशा पायऱ्या असतात. शेवटच्या तीन पायऱ्या व्यक्तीस व समाजाला घातक आहेत.

पिणाऱ्यापैकी जवळपास १० टक्के या शेवटच्या तीन पायऱ्यांवर आसतात. पण कोण संयमित पिणारे व कोण या शेवटच्या तीन प्रकारांत जाणात याचा पिण्याच्या सुरुवातीला कोणतेच शास्त्र अंदाज करु शकत नाही. शिवाय आज संयमित पिणारा उद्या घसरुन समस्याप्रधान पिणारा होऊ शकतो. एवढेच नाही तर या विविध पायऱ्यांमध्ये असा सतत दलबदल सुरुच असतो. म्हणजे हे वर्गीकरण स्थिर नाही, प्रवाही आहे. यामुळे पहिला ग्लास तोंडास लावणारा प्रत्येक माणूस केव्हाही या शेवटच्या तीन प्रकारांत दाखल होऊ शकतो. इतका जबरदस्त धोका असलेली सवय व्यक्तीने लावून घेणे तर्कसंगत आहे का ?

सामाजिक उपाय

समाजात एकूण किती माणसे भरमसाट पिणारी किंवा समस्याप्रधान पिणारी होतील हे सध्या तरी प्रामुख्याने दोनच गोष्टींवर अवलंबून आहे. एक, त्या समाजात एकूण कितीजण दारु पितात व दुसरे, त्या समाजात दारुचा एकूण खप किती. ज्या समाजात सर्वजण दारुचा केव्हा ना केव्हा आस्वाद घेतात त्यात एकूण बळी जास्त, ज्या समाजात दारुचा प्रतिमाणशी वापर अधिक (उदा. फ्रान्स, जर्मनी, रशिया) त्या समाजात दारुग्रस्त जास्त. या शास्त्रीय माहितीतून जागतिक बँक व वैद्यकीय तज्ज्ञांना सापडलेला मार्ग हा की कोणत्याही समाजातील दारुग्रस्त कमी करण्याचा प्रमुख मार्ग त्या समाजातील कमीत कमी लोकांनी दारु तोंडाला लावावी व समाजात एकूण दारु कमी खपावी. आणि म्हणूनच दारु पिण्याचा निर्णय व प्रमाण हे निव्वळ व्यक्तीवर न सोडता सामाजिक व शासकीय नियम हे आवश्यक आहेत, असा निष्कर्ष जागतिक बँक व रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्स काढतात.

शास्त्रीय ज्ञान व पारंपरिक शहाणपण इथे एकाच निर्णयावर येतात. दारुपासून दूर रहा! हिंदू, बौध्द, जैन, इस्लाम, शीख व सर्वच आशियाई धर्मांतली ही प्रमुख शिकवण आहे. नव्हे, भारतीय समाजाने तर धर्म व संस्कार यामार्फत दारु-नियंत्रणाचा प्रचंड मोठा सामाजिक प्रयोग दोन हजार वर्षांपासून केला. आजचे आधुनिक विज्ञान त्या शहाणपणाचे समर्थन करते आहे.

'संयमित कपण्याचा आनंद' ही दारुच्या कारखान्यांनी आजकाल उचलून धरलेली कल्पना ही परीसाच्या कल्पनेसारखी आहे. कल्पनेत छान, पण आजवर समाजाला न सापडलेली! म्हणून वर्ल्ड बँक, रॉयल कॉलेज व ब्रिटिश मेडिकल असोसिएशन आग्रहाने प्रतिपादन करतात की, शासन याबाबतीत 'व्यक्तीचे हित व्यक्तींच्या हाती' अशी बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. समाजाच्या व्यापक हिताला व पिणाऱ्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला समोर ठेवून शासनाने दारुचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र, आंध्र, ओरिसा, हरियाणामधील जनता, विशेषतः स्त्रिया, हेच म्हणत आहेत.

ही भविष्याची चाहूल का ?